ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २८८ • शुक्रवार दि.१४ ऑगस्ट २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## विकृत शक्तींना घाबरणार नाही:सुखबीरसिंघ बादल

### श्री.गुरु गोबिंदसिंघजींच्या आशिर्वादामुळेच हल्ल्यातून बचावलो



**रविन्द्र सिंघ मोदी**

नांदेड-कितीही हल्ले झाले तरी पंजाब कधी विकृत शक्तींना घाबरला नाही आणि घाबरणारही नाही. श्री. गुरु गोबिंदसिंघजी यांच्या आशिर्वादामुळेच दोनवेळा प्राणघातक हल्ल्यातून बवाचलो आहे अशा शब्दात पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीरसिंघ बादल यांनी आपल्या भावना पत्रकारांशी बोलतांना व्यक्त केल्या आहेत.

पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि शिरोमणि अकाली दल बादल पक्षाचे अध्यक्ष स.सुखबीरसिंघ बादल यांनी पंजाबला परतण्यापूर्वी शुक्रवारी दुपारी नांदेडमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. रुग्णालयातून ते थेट विमानतळाकडे रवाना झाले. त्यांनी श्री गुरु गोबिंदसिंघजी महाराजांचे आभार मानले की, त्यांच्या आशीर्वादामुळेच या हल्ल्यातून ते बचावले आहेत. त्यांनी सांगितले की, माझ्यावर अशा प्रकारचा हा दुसरा हल्ला आहे.

ते म्हणाले की, माझे वडील स्व. प्रकाशसिंघ बादल कधीही अशा अनैतिक आणि विकृत शक्तीपुढे झुकले नाहीत. त्यांनी कधीही अशा शक्तींशी तडजोड केली नाही. ते मुख्यमंत्री असताना त्यांनी सर्व धर्म समभावावर विश्वास ठेवला आणि पंजाबसाठी काम केले. मी त्यांच्याच पावलांवर चालत आहे. माझ्यासोबत अशा घटना दोन वेळा घडल्या आहेत. एक वर्षापूर्वी असाच प्रयत्न गोल्डन टेम्पल अमृतसर येथे झाला होता, पण सुदैवाने मी सुरक्षित राहिलो. दुसरी घटना आता श्री गुरु गोबिंदसिंघजी महाराज यांच्या भूमीवर माझ्यासोबत घडली आणि त्यातूनही मी बचावलो. गुरु महाराजांचा आशीर्वाद असल्यामुळेच मी या घटनेतून बचावलो.अशांतता पसरवणाऱ्या शक्तींनी मोठे प्रयत्न केले हे पान ४ वर

## दिल्लीतील सहा ठिकाणांना बॉम्बस्फोटाची धमकी

### स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत हायअलर्ट

नवी दिल्ली:स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर राजधानी दिल्लीत बॉम्बस्फोटांच्या धमकीने खळबळ उडाली आहे. दिल्ली उच्च न्यायालयासह सहा महत्त्वाच्या ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणण्याची धमकी ई-मेलद्वारे देण्यात आली. या घटनेनंतर सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून संबंधित ठिकाणी बॉम्बशोधक व नाशक पथके आणि अग्निशमन दल दाखल झाले.

दिल्ली उच्च न्यायालय, जामनगर हाऊस, झंडेवालान येथील फ्लॅटेड इमारत, साकेत येथील जिल्हाधिकारी कार्यालय, इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील टर्मिनल-३ आणि दिल्ली कॅन्टोन्मेंटमधील उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय या ठिकाणांना धमकी देण्यात आल्याची माहिती आहे. धमकी मिळताच सर्व ठिकाणी सुरक्षा पथकांनी तपासणी सुरू केली.परिसराची कसून झडती घेण्यात आली असून संशयास्पद वस्तू किंवा स्फोटकांचा शोध घेण्यात येत आहे. मात्र, प्राथमिक तपासणीत अद्याप कोणतीही संशयास्पद वस्तू आढळलेली नाही. दिल्ली उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रार जनरल कार्यालयाकडून पोलिसांशी संपर्क साधण्यात आला असून सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक खबरदारी घेतली जात आहे.

धमकीचा ई-मेल नेमका कुणी पाठविला, त्यामागील उद्देश काय आहे आणि त्यातील मजकूर काय आहे, याबाबत पोलिसांनी अद्याप अधिकृत माहिती दिलेली नाही. ई-मेलचा स्रोत शोधण्यासाठी तपास सुरू आहे.१५ ऑगस्टच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील महत्त्वाच्या ठिकाणी आधीपासूनच कडेकोट बंदोबस्त तैनात आहे. सार्वजनिक व गर्दीच्या ठिकाणी पान ४ वर

## जातनिहाय जनगणनेसाठी दुसऱ्या टप्प्यातील प्रश्नावली

### केंद्र सरकारकडून अध्यादेश जारी

नवी दिल्ली:केंद्र सरकारने २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी विचारण्यात येणाऱ्या सुमारे ४० प्रश्नांची प्रश्नावली एका अध्यादेशाद्वारे शुक्रवारी जारी केली आहे. या प्रश्नावलीत प्रथमच देशातील सर्व जातींची नोंद केली जाणार असून, त्यामुळे आगामी जनगणनेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक व्यक्तीची वैयक्तिक तसेच सामाजिक आणि आर्थिक माहिती संकलित केली जाणार आहे. त्यामध्ये व्यक्तीचे नाव, कुटुंबातील नाते, लिंग, जन्मतारीख, वय, वैवाहिक स्थिती, नागरिकत्व आणि धर्म यासारख्या बाबींचा समावेश आहे. याशिवाय अनुसूचित जाती-जमातीबरोबरच इतर सर्व जातींची माहिती घेतली जाणार आहे. जातनिहाय लोकसंख्येची अधिकृत आकडेवारी उपलब्ध झाल्यानंतर सामाजिक धोरणे, सरकारी योजना आणि आरक्षणासंदर्भातील चर्चेला नवे परिमाण मिळण्याची शक्यता आहे.प्रश्नावलीमध्ये मातृभाषा, इतर ज्ञात भाषा, साक्षरता, शैक्षणिक पात्रता, डिजिटल साक्षरता आणि शिक्षण घेत असल्याची माहितीही विचारली जाणार आहे. व्यक्तीचा व्यवसाय, रोजगाराची स्थिती, आर्थिक बाबी तसेच स्थलांतर केले असल्यास पान ४ वर

## कानाला मोबाईल भरधाव दुचाकी;तरुणांच्या जीवाशी खेळणारा बेफाम वेग



देगलूर/प्रतिनिधी-दुचाकीस्वारासाठी हेल्मेट वापरणे सक्तीचे असतानाही अनेक वाहन चालकाकडून शासनाच्या नियमांना केराची टोपली दाखवली जात आहे. हेल्मेट न वापरणे वाहन चालविताना मोबाईलवर बोलणे आणि भरधाव वेगाने दुचाकी चालविणे, या कारणामुळे अपघाताचे प्रमाण वाढत असून विशेषत: १८ ते ४० वयोगटातील तरुणांना मोठ्या प्रमाणात जीव गमावावा लागत आहे.

नांदेड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील अनेक रस्त्यावर दुचाकीस्वाराकडून वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होताना दिसते. हेल्मेट न वापरण्यासोबतच काही तरुण कानाला मोबाईल लावून वाहन चालवितात, वेगाने वाहन चालवून स्टंटबाजी करतात, त्यामुळे स्वत:सह इतर वाहन चालकांच्याही जीवाला धोका निर्माण होतो. शासनाने हेल्मेट वापरणे तसेच वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळण्याबाबत नियम केले आहेत. मात्र, नियम केवळ कागदावर राहून प्रत्यक्ष रस्त्यावर त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने अपघातांचे सत्र थांबताना दिसत नाही. आणि कुटुंबातील तरुण, करते व्यक्ती अपघातात गमावल्याने त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट कोसळत आहे. तरुणांचा वाढता अपघाती मृत्यू रोखण्यासाठी हेल्मेट न वापरणारे, मोबाईलवर बोलत वाहन चालविणारे तसेच बेफाम वेगाने वाहन चालविणाऱ्यावर नियमित पाळत ठेवून कठोर कारवाई करावी, अशी मागणी पालक,नागरिकांमधून होत आहे. वाहतूक नियमांचे काटेकोर पालन, जनजागृती आणि प्रभावी दंडात्मक कारवाई यांचा समन्वय साधल्यास अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होऊ शकते.त्यामुळे शासन व वाहतूक विभागाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन तरुणांचा अमूल्य जीव वाचविण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकां - कडून व्यक्त होत आहे.

## सौ.सुजाताताई नेम्मानिवार आणि सौ.माधवी तिरमनवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

किनवट/प्रतिनिधी-सौ. सुजाताताई अशोकराव नेम्मानिवार आणि सौ.माधवी किरण तिरमनवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार आज (१४ ऑगस्ट) दुपारी किनवट येथील कैलास मोक्षधाम स्मशानभूमीत करण्यात आले असून त्या पंचत्वात विलीन झाल्या. शेकडो लोकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार पार पडले.

**किनवट शहरावर शोककळा**



किनवटच्या इतिहासातील कदाचित ही पहिलीच घटना असावी. घटनेची माहिती मिळताच किनवटचे आ.भीमराव केराम यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तेथील भाजपा आमदारांसह पदाधिकाऱ्यानचे सहकार्य मिळाल्याचे समजते. १३ ऑगस्ट रोजी तेलंगणा राज्याच्या आदिलाबाद ते हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील आरमूर मंडळातील गोविंदपूर जवळ झालेल्या अपघातात ट्रॅव्हल्सच्या टायरखाली येऊन दूर्दैवी घटना घडली. आदिलाबाद येथील खासगी ट्रॅव्हल्स (टी.जी.२१ टी. २१७२) ही किनवट व परिसरातून दोन ट्रॅव्हल्सने साठ महिलां हैदराबाद येथील जीआर स्वामींच्या सत्संगासाठी जात असतांना ट्रॅव्हल्सचे पान ४ वर

## म्हैसींसह वगारांची अवैध वाहतूक करणारे आठ वाहन जप्त

नांदेड/प्रतिनिधी-कत्तलीसाठी म्हैस व वगार घेवून जाणारे आठ वाहन गुरुवारी रात्री लिंबगाव पोलीसांनी पकडले असून ३८ जनावरांची सुटका केली आहे.

नाळेश्वर फाटा येथुन पिकअप वाहनामध्ये म्हैस व वगारी बोलेरो पिकअप वाहनामध्ये दाटीवाटीने बांधुन कत्तलीसाठी घेवून जात असल्याची गोपनीय माहिती लिंबगाव पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली लिंबगाव



पोलीस स्टेशनचे सपोनी बोधनकर यांनी दोन पोलीसांच्या पथकांची स्थापना करुन नाळेश्वर फाटा परिसरात गुरुवारी रात्री नाकाबंदी केली. पोलीसांनी आठ बोलेरो पिकअप वाहन संशयास्पदरित्या जात असतांना पकडले. त्यामध्ये ३८ म्हैसी व वगार दाटीवाटीने बांधुन ठेवल्याचे पोलीसांना आढळून आले. पोलीसांनी आठ वाहनांच्या चालकांना ताब्यात घेतले असून त्यांच्यासह वाहन मालकांविरुध्द लिंबगाव पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ८० वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही अनेक गावांनी एसटी पाहिलीच नाही




### दुर्गम गावांतील नागरिकांची पायपीट कायम

**सरफराज दोसानी**

माहूर : देशाच्या स्वातंत्र्याची ८० वी पहाट उजाडत असताना विकासाच्या गगनभरारीच्या चर्चा सुरू आहेत. मात्र माहूर तालुक्यातील निम्म्याहून अधिक ग्रामीण भाग आजही मूलभूत दळणवळणाच्या सुविधेपासून वंचित असल्याचे चित्र आहे. रस्ता तेथे एसटी हे ब्रीदवाक्य असलेल्या राज्य परिवहन महामंडळाची बस तालुक्यातील अनेक दुर्गम गावांनी आजवर पाहिलेलीच नाही. स्वातंत्र्याच्या आठ दशकांनंतरही नागरिकांना दळणवळणासाठी पायपीट करावी लागत असल्याने विकासाच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

माहूर हा आदिवासीबहुल, दुर्गम आणि डोंगराळ तालुका. जंगल आणि डोंगररांगांच्या कुशीत वसलेल्या अनेक गावांमध्ये आजही नियमित सार्वजनिक वाहतूक पोहोचलेली नाही. काही गावांची लोकसंख्या ३०० ते ५०० च्या आसपास असतानाही एसटी सेवा उपलब्ध नसल्याने नागरिकांना खासगी अथवा अवैध प्रवासी वाहतुकीवर अवलंबून राहावे लागते. भौगोलिक अडचणी असल्या तरी या गावांपर्यंत सार्वजनिक वाहतूक पोहोचविण्याची जबाबदारी प्रशासनाचीच असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शेतकरी, महिला, वृद्ध आणि विद्यार्थ्यांना या परिस्थितीचा मोठा फटका बसत आहे. तहसील कार्यालय, पंचायत समिती, बँका, रुग्णालये किंवा अन्य शासकीय कार्यालयांमध्ये कामानिमित्त जाण्यासाठी अनेकांना पायी अथवा खासगी वाहनाने प्रवास करावा लागतो. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सायकल किंवा मिळेल त्या वाहनाचा आधार घ्यावा लागतो.एसटीच गावात येत नसल्याने शासनाच्या बसपास सवलतीचाही अनेक विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळत नाही. विशेषतः जंगल व डोंगराळ भागातून रात्री-अपरात्री करावा लागणारा प्रवास धोकादायक ठरत आहे. माहूर तालुक्यातील शेकापूर, मुरली, टाकळी, पडसा, लिंबायत, रुई, हडसनी, गुंडवळ, वडसा, सायफळ, लोकरवाडी, सत्तीगुडा, गोंडखेडी, रूपा नाईक तांडा, वायफणी, भगवती, तुळशी, मलकागुडा, लसनवाडी, चोरड, भोरड, जुनापाणी, नाईकवाडी, मेंढकी, मुंगशी, दिगडी, धानोरा, साकूर, पवनाळा, बोरवाडी, इवळेश्वर, शिऊर, महादापूर, कासारापेठ आणि हिंगणी आदी गावांमध्ये अद्याप नियमित एसटी सेवा पोहोचलेली नसल्याचा दावा करण्यात येत आहे. माहूर आगारात सुमारे २६ एसटी बसेस उपलब्ध असून त्यापैकी जवळपास १५ बसेस लांब पल्ल्याच्या मार्गावर धावत असल्याची माहिती आहे. आगाराला दररोज लाखो रुपयांचे उत्पन्न मिळत असतानाही तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना या आगाराचा अपेक्षित फायदा मिळत पान ४ वर

### विकास नेमका कुणाचा?

स्वातंत्र्याच्या ८० वर्षांनंतरही एखाद्या गावातील नागरिकाला शासकीय कार्यालय गाठण्यासाठी पायपीट करावी लागत असेल, विद्यार्थ्याला शिक्षणासाठी सायकलचा आधार घ्यावा लागत असेल आणि रुग्णाला उपचारासाठी खासगी वाहन शोधावे लागत असेल, तर विकासाच्या दाव्यांचे वास्तव काय?, असा सवाल माहूर तालुक्यातील नागरिक उपस्थित करीत आहेत.

## आश्चर्यकारक सांगता!

संसदेचे पावसाळी अधिवेशन यंदा सुरुवातीपासूनच वादळी ठरले. विरोधकांनी नीट पेपरफुटी, विद्यार्थ्यांचे प्रश्न, सरकारची जबाबदारी आणि इतर अनेक मुद्द्यांवर सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. सत्ताधारी पक्षानेही विरोधकांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले. मात्र या सर्व गदारोळात संसदेच्या कामकाजाचा किती वेळ वाया गेला आणि जनतेच्या प्रश्नांवर प्रत्यक्षात किती चर्चा झाली, हा प्रश्न अधिवेशन संपल्यानंतरही अनुत्तरितच राहिला आहे.या अधिवेशनात एकूण किती तास प्रत्यक्ष कामकाज झाले, याचा तपशील जनतेसमोर मांडला जाणे आवश्यक आहे. संसदेचे कामकाज म्हणजे केवळ विधेयके मंजूर करण्याची प्रक्रिया नव्हे. प्रश्नोत्तराचा तास, शून्य प्रहर, चर्चा, स्थगन प्रस्ताव, विविध विषयांवरील निवेदने आणि विरोधकांचे प्रश्न या सर्व माध्यमांतून लोकशाहीचा आवाज सभागृहात उमटत असतो. त्यामुळे संसदेचा प्रत्येक मिनिट हा जनतेच्या पैशातून चालतो, याचे भान सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही ठेवणे आवश्यक आहे. या अधिवेशनात काही महत्त्वाची विधेयके मंजूर झाली. त्यामुळे संसद पूर्णपणे निष्क्रिय होती असे म्हणता येणार नाही. परंतु ज्या पद्धतीने ही विधेयके मंजूर झाली आणि ज्या प्रमाणात त्यावर चर्चा झाली, त्याबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. विधेयक मंजूर करणे ही केवळ संख्याबळाची बाब नसून त्यामागील कायद्याचे दूरगामी परिणाम, सामान्य नागरिकांवर होणारा प्रभाव आणि त्यातील संभाव्य त्रुटी यावर सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे. संसदेची प्रतिष्ठा केवळ किती विधेयके मंजूर झाली यावर नव्हे, तर ती किती विचारपूर्वक मंजूर झाली यावर ठरते.या संपूर्ण अधिवेशनातील सर्वात चर्चेचा आणि आश्चर्यकारक प्रसंग ठरला तो केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भूमिकेचा. अनेक दिवस विरोधकांच्या प्रश्नांवर तुलनेने मौन बाळगल्यानंतर अधिवेशनाच्या अखेरच्या टप्प्यात त्यांनी विरोधकांच्या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्याची तयारी दर्शवली. सरकारच्या बाजूने हा आत्मविश्वासाचा संदेश मानला गेला. विरोधकांनाही आता गृहमंत्री सभागृहात येऊन त्यांच्या प्रश्नांना थेट उत्तरे देतील, अशी अपेक्षा निर्माण झाली. परंतु ज्या दिवशी प्रश्नांना उत्तरे देण्याची तयारी दर्शविण्यात आली, त्याच दिवशी गृहमंत्री सभागृहात उपस्थित राहिले नाहीत, ही बाब निश्चितच राजकीय चर्चेचा विषय ठरली. एखादा मंत्री स्वतःहून विरोधकांच्या प्रश्नांना उत्तरे देण्याची तयारी दर्शवतो आणि त्यानंतर त्या चर्चेच्या वेळी सभागृहात उपस्थित राहत नाही, तर जनतेच्या मनात प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. सरकारकडे प्रश्नांची उत्तरे असतील तर ती संसदेत देण्यास संकोच कशाचा?याहूनही आश्चर्यकारक घटना पुढील दिवशी घडली. दस्तुरखुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सभागृहात उपस्थित झाले. त्यामुळे आता काही महत्त्वपूर्ण चर्चा होईल, अशी अपेक्षा निर्माण झाली. परंतु सभागृहाचे कामकाज 'वंदे मातरम्'ने सुरू झाले आणि राष्ट्रगीतासमान सन्मानाच्या या राष्ट्रीय गीताचे गायन संपताच सभागृह अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आले. काही क्षणांपूर्वी सभागृहात देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री उपस्थित असताना चर्चा होण्याची संधीच न मिळता कामकाज संपले, ही परिस्थिती संसदीय इतिहासात निश्चितच वेगळी नोंद ठरेल. यातून प्रश्न असा निर्माण होतो की, सरकारला चर्चा करायची होती तरी कधी? विरोधकांना प्रश्न विचारायचे होते तरी कोणाला? आणि जनतेला उत्तरे मिळणार तरी कुठे? संसद ही लोकशाहीतील संवादाची सर्वोच्च संस्था आहे. येथे सरकारने विरोधकांचे प्रश्न ऐकायचे असतात आणि विरोधकांनी सरकारकडून उत्तरे मागायची असतात. दोन्ही बाजूंच्या या संवादातूनच लोकशाही अधिक बळकट होते.संसदेतील गोंधळासाठी केवळ विरोधकांना दोष देता येणार नाही. सरकारनेही विरोधकांना चर्चेसाठी पुरेसा वेळ आणि संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. त्याच वेळी विरोधकांनीही सभागृहाचे कामकाज सुरळीत चालू देण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. दोन्ही बाजूंनी आपापली जबाबदारी झटकली तर नुकसान मात्र जनतेचे होते. अधिवेशन संपले, पण प्रश्न संपले नाहीत. उलट काही प्रश्न अधिक गंभीर झाले आहेत. गृहमंत्री उत्तर देणार होते, पण आले नाहीत; पंतप्रधान आणि गृहमंत्री आले, पण चर्चा झाली नाही; सभागृह सुरू झाले आणि लगेच अनिश्चित काळासाठी स्थगित झाले. या घटनाक्रमाला 'आश्चर्यकारक सांगता' यापेक्षा दुसरे वर्णन काय असू शकते? संसदेचे पुढील अधिवेशन अधिक अर्थपूर्ण व्हावे, एवढीच अपेक्षा. सत्ताधाऱ्यांनी बहुमताचा आणि विरोधकांनी संख्याबळाचा अहंकार बाजूला ठेवून जनतेच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. कारण संसदेत गप्प बसणारे किंवा सभागृह टाळणारे मंत्री आणि गोंधळामुळे प्रश्न विचारू न शकणारे विरोधक, दोन्ही परिस्थितीत हरते ती लोकशाही आणि नुकसान होते ते सामान्य जनतेचे.

## साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील समर्पण:प्रा.डॉ.मथुताई सावंत



प्रा.डॉ.बालाजी पोतुलवार
नांदेड

पीपल्स कॉलेज, नांदेड येथील पदव्युत्तर मराठी विभागाला समृद्ध शैक्षणिक आणि साहित्यिक परंपरा लाभलेली आहे. अध्यापन, संशोधन, साहित्यनिर्मिती, वैचारिक चर्चा आणि समाजभान यांचा सुंदर संगम या विभागाच्या वाटचालीत दिसतो. या परंपरेत आपल्या प्रदीर्घ कार्याने अर्थपूर्ण भर घालणाऱ्या प्रा. डॉ. मथुताई सावंत यांचे स्थान विशेष आहे. २००५ पासून त्या पदव्युत्तर मराठी विभाग व संशोधन केंद्रात प्राध्यापिका आणि संशोधन मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. गेल्या एकवीस वर्षांपासून मला त्यांच्यासोबत सहकारी म्हणून काम करण्याचा योग लाभला. त्यामुळे त्यांच्या कार्याचा आढावा घेताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू जवळून अनुभवता आले. उद्या १५ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिन आणि याच महिन्याच्या अखेरीस, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी त्या महाविद्यालयीन सेवेतून निवृत्त होत आहेत. या दोन घटनांच्या उंबरठ्यावर उभे राहून त्यांच्या प्रदीर्घ कार्याकडे पाहताना शिक्षण, साहित्य आणि समाज या तिन्ही क्षेत्रांशी त्यांनी जपलेले नाते अधिक ठळकपणे जाणवते.

राजर्षी शाहू विद्यालयात १९८६ ते २००५ या कालखंडात माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर मराठीचे अध्यापन करत त्यांनी शिक्षक म्हणून आपली भक्कम पायाभरणी केली. सेवेत असतानाच बी. ए., एम.ए., बी.एड. आणि पीएच.डी. या पदव्या संपादन करून त्यांनी स्वतःच्या ज्ञानकक्षा सातत्याने विस्तारल्या. पीपल्स कॉलेजमध्ये आल्यानंतर पदवी आणि पदव्युत्तर वर्गांचे अध्यापन, संशोधन मार्गदर्शन, परीक्षक व प्राश्निक म्हणून विद्यापीठीय जबाबदाऱ्या, चर्चासत्रे, परिसंवाद आणि व्याख्यानांमधील सहभाग अशा विविध अंगांनी त्यांनी शैक्षणिक क्षेत्र समृद्ध केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पाच विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्ण केली असून ३९ विद्यार्थ्यांनी एम.फिल. संपादन केले आहे. चाळीसपेक्षा अधिक शोधनिबंध त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या दृष्टीने अध्यापन म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनात विषयाची आस्था निर्माण करण्याची प्रक्रिया, तर संशोधन म्हणजे प्रश्नांकडे चिकित्सकपणे पाहण्याची सवय. या दृष्टिकोनामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी आणि संशोधक घडले.

महाविद्यालयातील मराठी विभागाच्या बौद्धिक वातावरणात त्यांच्या अभ्यासू उपस्थितीने सातत्याने भर पडली. साहित्यिक परंपरेशी नाते जपत त्यांनी अध्यापन आणि संशोधनाला सर्जनशीलतेची जोड दिली आणि विभागाच्या वाटचालीत स्वतःचा ठसा उमटविला. साहित्यसाधना हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक समृद्ध पैलू आहे. पाण्यातील पायवाट, राहुकेतू, जिनगानी, समाजशिक्षिका सावित्रीबाई फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज, नवरसांची नवलाई, तिची वाटच वेगळी, कथाकार भास्कर चंदनशिव, निवडुंगाची फुलं, पाणबळी, सर्जनाचा शोध, लगीनघाई? मुळीच नाही!, सूर्यमुद्रा, समाज, साहित्य आणि संस्कृती, साहित्यसौरभ, अधोरेखित, अक्षरवाटा तसेच संपादन आणि सहकार्याने प्रकाशित झालेले विविध ग्रंथ अशी त्यांची समृद्ध साहित्यसंपदा आहे.

कथा, कादंबरी, समीक्षा, चरित्र, नाटक, बालसाहित्य आणि संपादन या विविध प्रकारांतून त्यांनी ग्रामीण जीवन, स्त्रीजीवन, सामाजिक वास्तव, मानवी नाती, परिवर्तनाची आकांक्षा आणि संवेदनशील माणूस यांचा शोध घेतला. राहुकेतू या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा अण्णाभाऊ साठे पुरस्कार, नरहर कुरुंदकर वाङ्मय पुरस्कार यांसह विविध सन्मान मिळाले. तिची वाटच वेगळी या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती पुरस्कारासह अनेक प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त झाले. निवडुंगाची फुलं या बालकथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा साने गुरुजी साहित्य पुरस्कार लाभला. सर्जनाचा शोध, कथाकार भास्कर चंदनशिव, अधोरेखित यांसारख्या समीक्षाग्रंथांनाही विविध संस्थांनी गौरविले. कादंबरी लेखनातील योगदानासाठी मालतीबाई दांडेकर जीवनगौरव पुरस्कार आणि समग्र साहित्यसेवेसाठी नरहर कुरुंदकर साहित्य पुरस्कार यांसारखे सन्मान त्यांच्या साहित्यिक कार्याची व्यापक दखल अधोरेखित करतात. त्यांच्या तिची वाटच वेगळी या कथासंग्रहाचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश झाला; त्यातील एक कथा बारावीच्या कुमारभारती पाठ्यपुस्तकात आली. राहुकेतू आणि जिनगानी या कादंबऱ्या एम.ए.च्या ग्रामीण साहित्य चळवळीचा अभ्यास या अभ्यासपत्रिकेत समाविष्ट झाल्या, तर पाणबळी ही कथा पदवीच्या अभ्यासक्रमात आली. कथाकार भास्कर चंदनशिव हा समीक्षाग्रंथ संदर्भग्रंथ म्हणून उपयुक्त ठरला. साहित्य संमेलनांच्या अध्यक्षपदापासून साहित्य संजीवनच्या संपादनापर्यंत आणि नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यापासून साहित्य प्रकाशनाच्या चळवळीतील सहभागापर्यंत त्यांनी सातत्याने कार्य केले. त्यांच्या साहित्याला अनेक पुरस्कार मिळाले, अभ्यासक्रमात स्थान मिळाले आणि समीक्षकांनी त्यांची नोंद घेतली; त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या लेखनाने अनेक वाचकांच्या अनुभवविश्वाला शब्द दिले.

साहित्य आणि शिक्षणाच्या पलीकडे त्यांचे समाजाशी असलेले नातेही तितकेच व्यापक आहे. जिल्हा परिषद सदस्या म्हणून काम करताना शिक्षण, महिला विकास, ग्रामीण आरोग्य, वाचनसंस्कृती आणि ग्रामविकास या विषयांवर त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. विविध समित्या, महिला तक्रार निवारण समित्या, सामाजिक संस्था, साहित्यिक संस्था, सहकारी संस्था, महाविद्यालय विकास समिती आणि अभ्यासक्रम मंडळ अशा अनेक जबाबदाऱ्यांमध्ये त्यांनी काम केले. ग्रामीण भागातील मुला-मुलींना शैक्षणिक साहित्याची मदत, गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी सहकार्य, मुलींच्या शिक्षणासाठी सायकली, आरोग्य शिबिरांचे आयोजन, वाचनालय चळवळीला प्रोत्साहन, ग्रामस्वच्छता, महिला जागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, हुंडाबंदी आणि बालविवाहविरोधी प्रबोधन अशा अनेक उपक्रमांत त्यांचा सहभाग राहिला आहे.

कौटुंबिक समस्या निवारण केंद्राच्या सल्लागार म्हणून त्यांनी अनेक कुटुंबांना समुपदेशन आणि मार्गदर्शन दिले. साहित्यिक क्षेत्रात साहित्य संजीवन या वार्षिकाचे अनेक वर्षे संपादन करून नवोदितांना संधी दिली. नांदेड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून नरहर कुरुंदकर साहित्य पुरस्काराची योजना सुरू करण्यासाठीही त्यांनी योगदान दिले. शिक्षकांच्या अंगी असलेल्या साहित्यिक गुणांना वाव मिळावा म्हणून साहित्य संमेलने, कथाकथन, काव्यवाचन, परिसंवाद आणि विविध साहित्यिक उपक्रमांना त्यांनी चालना दिली. या व्यापक कार्यामागे त्यांच्या जीवनातील शिस्त, वाचनाची सवय, लेखनाची आवड आणि लोकांशी जोडले जाण्याची सहज वृत्ती दिसते.

त्यांच्या कुटुंबातील संस्कारांचाही या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत मोठा वाटा आहे. त्यांचे पती डॉ. सुरेश सावंत हे उत्कृष्ट लेखन करणारे साहित्यिक आणि राष्ट्रपती पुढे मुख्याध्यापक म्हणून परिचित आहेत. शिस्त, वाचन, लेखन आणि शिक्षण यांना त्यांनी आपल्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान दिले आणि मथुताईंच्या साहित्यिक व शैक्षणिक वाटचालीला सदैव भक्कम साथ दिली. सौरभ आणि संकेत ही त्यांची मुले तसेच त्यांच्या सुना यांच्यातील विनयशीलता, शांत स्वभाव आणि कामाची शिस्त सावंत कुटुंबातील संस्कारांची साक्ष देतात. परिवारात शिक्षण, साहित्य, संस्कार आणि लोकसंपर्क यांची जपलेली परंपरा मथुताईंच्या व्यक्तिमत्त्वातूनही प्रत्ययास येते. म्हणूनच त्यांच्या कार्याकडे पाहताना त्यांच्या मागे उभ्या असलेल्या या संस्कारविश्वाची जाणीव मनात राहते.

गेल्या एकवीस वर्षांच्या सहवासातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची अधिक चांगली ओळख झाली. मराठी विभागात आम्ही शेजारी असल्यामुळे विविध विषयांवर आमच्या नेहमी चर्चा होत. लेखन, वाचन, अध्यापन, आहार-विहार, आरोग्य, विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि महाविद्यालयातील विविध उपक्रम अशा अनेक विषयांवर त्यांच्याशी संवाद होत असे. महाविद्यालयात वेळेवर येणे आणि तासिकेला वेळेवर जाणे ही त्यांची शिस्त मी सातत्याने अनुभवली. वर्गात विद्यार्थी असताना त्या वर्गावर गेल्या नाहीत, असा प्रसंग माझ्या स्मरणात नाही. राजर्षी शाहू विद्यालयातील आदर्श शिक्षिकेची त्यांची ओळख पीपल्स कॉलेजमध्येही तितक्याच ताकदीने टिकली. सेवेत कामाची कुचराई न करता त्यांनी स्वतःच्या कर्तव्याला सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यामुळे पद, प्रतिष्ठा किंवा कोणाचे मन राखण्यासाठी करायची धावपळ त्यांच्या स्वभावात आली नाही. महाविद्यालयातील पदे किंवा प्रतिष्ठेची स्थानं त्यांनी कधीच स्वतःहून मागितली नाहीत. किंबहुना हक्काच्या संधीही प्रसंगी शांतपणे सोडून दिल्या.

सार्वजनिक जीवनात मोठ्या जबाबदाऱ्या सांभाळलेल्या आणि साहित्यविश्वात मानाचे स्थान मिळवलेल्या या ज्येष्ठ लेखिकेच्या डोळ्यांत काही प्रसंगी आलेले अश्रू मी जवळून पाहिले आहेत. प्रशासनाला त्यांनी कधीही त्रास दिला नाही. आपल्या वाट्याला आलेले काम शांतपणे आणि जबाबदारीने करत राहिल्या. काही प्रसंगी त्यांना झालेला मनस्ताप पाहताना मनाला वेदना झाल्या. त्याच वेळी त्यांच्या संयमाची आणि सहनशक्तीची जाणीवही झाली. महाविद्यालयात किंवा त्यांच्या संपर्कात आलेला एखादा विद्यार्थी मानसिक तणावात असेल, एखादी व्यक्ती अडचणीत असेल, तर त्याला ऐकून घेऊन योग्य सल्ला आणि आधार देण्याची त्यांची वृत्ती आहे. विभागात डॉ. अनंत राऊत सर आणि मथुताई सावंत या दोघा सहकाऱ्यांकडून अडचणीच्या काळात मिळणारा मानसिक आधार अनेकांसाठी महत्त्वाचा राहिला.

मथुताई नेहमीच प्रेमाने सांगतात, प्रकृतीची काळजी घ्या. आरोग्याची काळजी घ्या. त्यांच्या या साध्या वाक्यात सहकाऱ्याविषयीची खोल आत्मीयता दडलेली असते. ३१ ऑगस्टनंतर त्यांच्या केबिनमध्ये ती आश्वासक उपस्थिती दिसणार नाही. दिवसभर वाचन, लेखन, विद्यार्थ्यांशी संवाद आणि सहकाऱ्यांशी चर्चा करणारी ती जागा मनाला अनेक आठवणी देत राहील. संवाद साधणारी माणसे कमी होत चाललेल्या काळात मथुताईंसारख्या व्यक्तीची निवृत्ती ही मराठी विभागासाठी भावनिक घटना आहे. त्यांची जागा एखाद्या नियुक्तीने भरली जाईल, पण त्यांच्या सहवासातून निर्माण झालेला विश्वास मात्र आठवणींतच जपावा लागेल.

१५ ऑगस्टच्या त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा आणि ३१ ऑगस्टनंतरच्या नव्या जीवनप्रवासासाठी हार्दिक सदिच्छा. त्यांच्या लेखणीला नवे विषय मिळोत, संशोधनाची वाट अधिक समृद्ध होवो, आरोग्य उत्तम राहो आणि साहित्य, शिक्षण व समाजाशी त्यांचा संवाद अधिक व्यापक होत राहो. पीपल्स कॉलेजच्या मराठी विभागाच्या साहित्यिक परंपरेत त्यांनी घातलेली भर, त्यांच्या विद्यार्थ्यांच्या कार्यातून, संशोधकांच्या लेखणीतून आणि त्यांच्या समृद्ध साहित्यकृतींतून पुढेही जाणवत राहील. त्यांच्या प्रदीर्घ कार्याला मनापासून सलाम आणि त्यांच्या पुढील आयुष्यासाठी सस्नेह शुभेच्छा.

## महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समिती दौऱ्याच्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समितीचा नांदेड जिल्हा दौरा येत्या १९ ते २१ ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्याच्या अनुषंगाने जिल्ह्यातील अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना, विकासकामे, कल्याणकारी उपक्रम तसेच विभागनिहाय प्रलंबित बाबींचा सविस्तर आढावा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात घेण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, किनवटचे सहायक जिल्हाधिकारी तथा आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी बी. सरवनन, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह विविध संबंधित विभागांचे अधिकारी, कक्षप्रमुख, आमदार महोदयांचे संपर्क प्रमुख आदींची उपस्थिती होती. अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या जिल्हा दौऱ्यादरम्यान समितीसमोर सादर करण्यात येणारी विभागनिहाय माहिती, प्रगती अहवाल, योजनांची सद्यस्थिती, मंजूर व प्रलंबित कामे, निधीची उपलब्धता व खर्च, लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या विविध योजनांच्या लाभाची माहिती तसेच अनुसूचित जमाती बांधवांच्या विविध प्रश्नांबाबत आवश्यक माहिती अद्ययावत ठेवण्याच्या दृष्टीने बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीमध्ये जिल्ह्यातील आदिवासी भागातील शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते व दळणवळण, महिला व बालविकास, सामाजिक न्याय, कृषी, पशुसंवर्धन, ग्रामविकास, रोजगार, कौशल्य विकास, आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना तसेच पायाभूत सुविधांशी संबंधित विषयांचा विभागनिहाय आढावा घेण्यात आला. आदिवासीबहुल व दुर्गम भागातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा प्रभावीपणे लाभ मिळत आहे किंवा नाही, पात्र लाभार्थी योजनांपासून वंचित राहणार नाहीत यासाठी करण्यात येणारी कार्यवाही, योजनांच्या अंमल-बजावणीतील अडचणी आणि त्यावरील उपाय योजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. तसेच अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या दौऱ्यादरम्यान समिती सदस्यांकडून विविध विभागांना भेटी देऊन प्रत्यक्ष वस्तीगृहे, इतर बाबींची पाहणी करतात त्या दृष्टीने प्रत्येक विभागांनी आवश्यक कागदपत्रे, अहवाल, सांख्यिकीय माहिती, योजनानिहाय प्रगती, छायाचित्रे तसेच इतर आवश्यक अभिलेख अद्ययावत ठेवण्याबाबत निर्देश देण्यात आले.

जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्या विभागाशी संबंधित अनुसूचित जमाती कल्याणाच्या योजनांची अद्ययावत व अचूक माहिती तयार ठेवावी. योजनांची मंजुरी, निधी प्राप्ती, निधीचा विनियोग, भौतिक व आर्थिक प्रगती, लाभार्थी संख्या, प्रलंबित प्रकरणे तसेच पूर्ण झालेल्या कामांची माहिती स्पष्टपणे उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या. विशेषतः आदिवासीबहुल क्षेत्रातील विकासकामे, मूलभूत सुविधा आणि शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या अडचणींचा तातडीने निपटारा करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. नागरिकांच्या तक्रारी व मागण्यांवर संवेदनशीलतेने कार्यवाही करून प्रलंबित बाबी वेळेत निकाली काढण्यावर भर देण्यात आला.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा तसेच आदिवासीबहुल क्षेत्रातील विकासकामांचा बैठकीत विशेष आढावा घेण्यात आला. आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षण, शैक्षणिक सुविधा, आश्रमशाळा व वसतिगृहे, आरोग्य सुविधा, रोजगाराच्या संधी, स्वयंरोजगार, कृषीविषयक योजना आणि मूलभूत पायाभूत सुविधांबाबतची माहिती अद्ययावत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. दुर्गम व अतिदुर्गम भागातील नागरिकांपर्यंत शासनाच्या योजना प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विभागांमध्ये समन्वय ठेवण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. आदिवासी आश्रमशाळा, अनुदानित शाळा, शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मिळणा-या सोई-सुविधा, तपासणी करण्याबाब तसेच सबंधीत योजना अमंलबजावणी योग्यरित्या होते की नाही, आदिवासी शासकीय कर्मचारी यांचे जात प्रमाणपत्रे पडताळणी झाली किंवा कसे, आदिवासी जमीनीचे अग्रीस्टॅक, त्यांचे केवायसी आस्थापना विषयक बाबींची सविस्तर माहिती ठेवण्याबाबत सुचना दिल्या. आपल्या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील अधिकारी, कर्मचारी यांच्या भरती, बढती, आरक्षण, आनुशेष व जात पडताळणी बाबी संदर्भात तसेच शासकीय यंत्रणांनी आदिवासी उपयोजना व बाहयक्षेत्रात आदिवासीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनाची अंमलबाजावणी योग्यरित्या होते का कसे या बाबतच्या सुचना दिल्या.

अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या दौऱ्यादरम्यान विविध विभागांकडून सादर करण्यात येणाऱ्या माहितीमध्ये अचूकता, सुसूत्रता व एकसंधता राहावी, यासाठी नियुक्त कक्षप्रमुखांनी संबंधित विभागांशी सातत्याने समन्वय साधावा, अशा सूचना देण्यात आल्या. प्रत्येक विभागाने आपल्या विभागाशी संबंधित विषयांची तयारी पूर्ण करून आवश्यक कागदपत्रे व माहिती विहित स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# मंडल यात्रेतून ओबीसी जनजागृतीला बळ



नागपूर:महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागातर्फे आयोजित पूर्व विदर्भातील पाच दिवसीय मंडल यात्रा उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडली. या यात्रेत ६ जिल्ह्यांतील ६४ तालुके, ३२ विधानसभा आणि ६ लोकसभा मतदारसंघांत जनसंपर्क साधण्यात आला.

प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. यशपाल भिंगे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या यात्रेची सुरुवात नागपूरच्या संविधान चौकातून झाली. माजी मंत्री सुनील केदार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यात्रेदरम्यान विविध ठिकाणी सभा, कार्यकर्ता बैठका आणि जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. ओबीसी आरक्षण, जातनिहाय जनगणना, शिक्षण, रोजगार, राजकीय प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्याय या विषयांवर जनसंवाद साधण्यात आला.मंडल आयोग हा केवळ आरक्षणाचा विषय नसून सामाजिक न्याय व प्रतिनिधित्वाचा व्यापक विचार असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. यात्रेचे स्वागत विविध ओबीसी संघटना व कार्यकर्त्यांनी केले. माजी मंत्री नानाभाऊ पटोले, आ.अभिजीत वंजारी, शिक्षक आ.सुधाकर अडबाले, माजी आ.सुभाष धोटे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले. दि.११ ऑगस्ट रोजी वर्धा येथील सेवाग्राममधील चरखा भवन येथे यात्रेचा समारोप झाला. यात्रेचे संयोजक मोरेश्वर भादे यांच्यासह अजय हाटेवार, अवंतिका लेकुरवाळे, कैलास फाटे, एकनाथराव पाटील, सोपान देवकते आदींनी यात्रेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. महाराष्ट्रातील इतर भागांतही मंडल विचार पोहोचविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# कनकेवाडी शिवारातील जुगार अड्डयावर पोलीसांची धाड;आठ जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-मनाठा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मौजे कनकेवाडी शिवारात सुरु असलेल्या जुगार अड्डयावर बुधवारी रात्री पोलीसांनी धाड टाकुन जुगार खेळणाऱ्या आठ जणांना अटक केली. त्यांच्याकडून चार लाख ७० हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे.

मौजे कनकेवाडी शिवारातील रेल्वे ट्रकजवळ जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती मनाठा पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली मनाठा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास चवळी यांच्या नेतृत्वाखाली फौजदार सुदर्शन इंगोले, फौजदार पिराजी गायकवाड व पोलीस कर्मचाऱ्यांनी बुधवारी रात्री जुगार अड्डयावर धाड टाकली. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना शिवम विरेंद्र जयस्वाल (वय २८) रा.मनाठा, दिलीप जटोजी लोमटे (वय ५२) रा.मनाठा, ज्ञानेश्वर बालाजी कदम (वय २५) रा.चुंचा, अमोल साहेबराव शिंदे (वय ३२) रा.चुंचा, परमेश्वर मारोतराव लोमटे (वय २८) रा.चुंचा, भानुदास नरहरी चव्हाण (वय ४२) रा.चुंचा, लक्ष्मण कैलाश सूर्यवंशी (वय ३१) रा.चिखली, राजेश राजाराम फुपसे (वय ३७) रा.वारंगा यांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून पोलीसांनी रोख २० हजार रुपये, पाच मोबाईल, आठ मोटरसायकली व जुगाराचे साहित्य असा ४ लाख ७० हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. आठ जणांविरुध्द मनाठा पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गणेशोत्सवापूर्वी वाहतूक कोंडी टाळा;मूर्ती विक्रेत्यांना स्वतंत्र स्टॉल द्या

## समाधान ग्रुपची नगरपरिषदेकडे मागणी

उमरखेड/प्रतिनिधी-गणेशोत्सव, दुर्गोत्सव आणि श्रावणातील सणांच्या पार्श्वभूमीवर मुख्य चौकात मूर्ती व पूजा साहित्याच्या दुकानांमुळे होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी स्वतंत्र विक्री केंद्र उभारावे, अशी मागणी समस्या निराकरण समाधान ग्रुपने नगरपरिषदेकडे केली आहे.



ग्रुपच्या सदस्यांनी उपमुख्याधिकारी नितीन चव्हाण यांना निवेदन दिले. गांधी चौक, खडकपुरा, छत्रपती शिवाजी चौक आदी ठिकाणी रस्त्यालगत दुकाने लागल्याने नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिकांना त्रास होतो आणि वाहतूक कोंडी होते, असे निवेदनात म्हटले आहे. कॉटन मार्केट यार्ड, सर्कस ग्राउंड किंवा महागाव रोड परिसरात १०x२० फुटांचे स्टॉल भाडेतत्त्वावर उपलब्ध करून द्यावेत, अशी सूचना करण्यात आली आहे. फटाका विक्रेत्यांप्रमाणेच मूर्ती विक्रेत्यांसाठी व्यवस्था केल्यास मुख्य रस्ते मोकळे राहतील आणि आपत्कालीन वाहनांना मार्ग मिळेल. निवेदन देताना विजय आडे, डॉ. राम राठोड, दीपक ठाकरे, गणेश शिंदे, बंडू पाध्ये, सुरेश वाघ, प्रशांत आयाचित, अनिल देशपांडे यांच्यासह समस्या निराकरण समाधान ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

# भारतीय बौद्ध महासभेच्या उमरी शहराध्यक्षपदी त्रिरत्न सवई

उमरी/प्रतिनिधी-भारतीय बौद्ध महासभेच्या उमरी तालुका शाखेची बैठक शुक्रवार, दि.१४ ऑगस्ट रोजी तालुकाध्यक्ष शंकर सोनकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत भारतीय बौद्ध महासभेची उमरी शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

यावेळी शहराध्यक्षपदी त्रिरत्न सवई तर सरचिटणीसपदी गौतम लांडगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे उमरी शहरातून अभिनंदन करण्यात येत आहे. बैठकीस भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष शंकर सोनकांबळे, सरचिटणीस गंगाधर जोंधळे, कोषाध्यक्ष भीमराव वाघमारे, संस्कार उपाध्यक्ष अशोक खंडेलोटे, पर्यटन प्रसार सचिव



प्रकाश कारलेकर, पर्यटन उपाध्यक्ष सोपान कांबळे, सचिव लक्ष्मण खंदारे, कार्यालयीन सचिव के. एन. पवार, सखाराम पवार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नवनियुक्त शहराध्यक्ष त्रिरत्न सवई व सरचिटणीस गौतम लांडगे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय बौद्ध महासभेचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी विविध सामाजिक, धम्मप्रसार व जनजागृतीचे उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

# कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचा नांदेड दौरा

नांदेड/प्रतिनिधी-राज्याचे कृषी मंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे हे शनिवार १५ ऑगस्ट रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. शनिवार १५ ऑगस्ट रोजी सायं. ४ वा. सावली रेस्ट हाऊस परभणी येथून नांदेड विमानतळ नांदेडकडे प्रयाण. सायं. ५.१५ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व राखीव. सायं. ६.४५ वा. विमानाने पुण्याकडे प्रयाण करतील.

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व.स्तर, ता.बिलोली जि.नांदेड
यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६०/२०२६
पुढील तारीख - १०.०९.२०२६

१) ललिता माधव काळे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. थडी सावळी पोस्ट आदमपुर, ता. बिलोली, जि.नांदेड, २) नेहा कीर्तिराज सोनकांबळे (पि.माधव काळे), वय २५ वर्षे, धंदा घरकाम, रा.सिध्दार्थ नगर, देगलुर, ता.देगलुर, जि.नांदेड, ३) प्रतिक्षा माधवराव काळे, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा.सावरखेडा, पोस्ट हिंगोली, ता.जि. हिंगोली, ४) सोनाली माधवराव काळे, वय २७ वर्षे, धंदा घरकाम, रा. हर्श नगर, वागी, नांदेड, ता.जि.नांदेड, ५) शुभम माधव काळे, वय २५ वर्षे, धंदा विद्यार्थी, रा.थडी सावळी पोस्ट आदमपुर, ता. बिलोली, जि.नांदेड, ६) काळे सानिका माधव, वय २३ वर्षे, धंदा घरकाम, रा.शिरड शहापुर, ता.औंढा ना. जि.हिंगोली, ७) राणी माधव काळे, वय २१ वर्षे, धंदा विद्यार्थी, रा.शिरड शहापुर, ता.औंढा ना. जि. हिंगोली, ८) ऋतुजा माधव काळे अ.पा.क.सख्खी आई अर्जदार क्र.०१, वय १६ वर्षे, धंदा विद्यार्थी, रा. शिरड शहापुर, ता. औंढा ना. जि.हिंगोली

विरुध्द

गैरअर्जदारः निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०८ हे मयत माधव सटवाजी काळे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ही मयत माधव सटवाजी काळे यांची पत्नी आहे. अर्जदार क्रमांक ०२ ते ०८ हे मयत माधव सटवाजी काळे यांचे अपत्ये आहेत. मयत माधव सटवाजी काळे यांचा मृत्यु दिनांक १७.०६.२०२६ रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०८ हयांना मयत माधव सटवाजी काळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात मयत माधव सटवाजी काळे यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे मयत माधव सटवाजी काळे यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर मयत माधव सटवाजी काळे यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे मयत माधव सटवाजी काळे यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयत माधव सटवाजी काळे यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०७/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरून |
| क.लिपिक | स्वाक्षरित/- |
| दिवाणी न्यायालय व.स्तर | सहा.अधिक्षक |
| बिलोली | दिवाणी न्यायालय व.स्तर,बिलोली |

# तरुणाचा खून करुन मृतदेह झाडाला टांगला

नायगाव/प्रतिनिधी-नरसी ते बिलोली रोडवरील फौजी बार समोरील शेतात लिंबाच्या झाडाला एका २७ वर्षीय तरुणाचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत आढळून आल्याने नरसी परिसरात खळबळ उडाली. मृत तरुणाचे नाव दिपक वानोळे असल्याचे समोर आले आहे. ही घटना गुरुवारी (दि.१३) पहाटे उघडकीस आली.

मृतदेहाचा चेहरा कपड्याने बांधलेला होता, तर दोन्ही हात दस्तीने बांधलेले होते. तसेच शरीरावर मारहाणीच्या जखमा आढळून आल्याने हा आत्महत्येचा प्रकार नसून खून करून मृतदेह झाडाला लटकवण्यात आला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे.नरसी बसस्थानकापासून अवघ्या दीड किलोमीटर अंतरावर ही घटना घडली. मृतदेहाची अवस्था, हात बांधलेले असणे आणि चेहरा झाकलेला असणे यामुळे घटनेचे गूढ अधिकच वाढले आहे. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.घटनेची माहिती मिळताच रामतीर्थ पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला असून घटनास्थळावरून आवश्यक पुरावे संकलित करण्यात येत आहेत. दिपक वानोळे याचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, त्याचा खून कुठे करण्यात आला आणि या घटनेमागे कोणाचा हात आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. या घटनेमुळे नरसी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपींचा शोध घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री पी. ए. खंडारे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १३००/२०२५
फरहत बेगम व इतर वि.नसीम बेगम व इतर

अर्जदार : १. फरहत बेगम भ्र. मोहम्मद कलिम, वय : ३८ वर्षे धंदा : घरकाम, रा.पीर नगर, नांदेड, २. तसनीम बेगम भ्र. अब्दुलाह खान, वय : ५० वर्षे धंदा : घरकाम, रा.वरसीगोडा, कौसर मस्जीदच्या पुढे सिकंदराबाद, तेलंगाणा.

विरुद्ध

गैरमर्जदार : १. नसीम बेगम भ्र. मोहम्मद इकबाल, वय : ७२ वर्षे धंदा : घरकाम, २. मोहम्मद इफतेकर भ्र.मोहम्मद इकबाल, वय : ४६ वर्षे धंदा : व्यापार, ३. मोहम्मद एजाज पि.मोहम्मद इकबाल, वय : ५० वर्षे धंदा : व्यापार, ४. मोहम्मद इलीयास पि. मोहम्मद इकबाल, वय : ४२ वर्षे धंदा : व्यापार, ५. मोहम्मद असलम पि. मोहम्मद इकबाल, वय : ४० वर्षे धंदा : व्यापार, ६. कौसर बेगम भ्र. अल्ताफ हुसैन फारूकी, वय : ४६ वर्षे धंदा : घरकाम, सर्व रा. विसावा नगर आयटीआय रोड, नांदेड, ७. वसीम बेगम भ्र. तैमुर अली, वय : ४९ वर्षे धंदा : घरकाम, रा. फिश मार्केट इतवारा, नांदेड, ८. रफत बेगम भ्र. मोहम्मद जावीद वय : ३५ वर्षे धंदा : घरकाम, रा.बी.एस.एन.एल. टावर गोडाउन पुढे, देगलूर, ता. देगलूर, जि. नांदेड.

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत मोहम्मद इकबाल पि. फेरोज अली यांचे वारस आहेत. मयत मोहम्मद इकबाल पि. फेरोज अली यांचा दिनांक २६/०८/२०२२ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे की, अर्जदार क्र.१ व २ या मयताच्या मुली, गैरअर्जदार क्र. १ ही पत्नी, गैरअर्जदार क्र. २ ते ५ हे मयताचे सख्खे भाऊ व गैरअर्जदार क्र. ६ ते ८ या मयताच्या सख्या बहीणी आहेत.

वर नमुद अर्जदार व गैरअर्जदाराशिवाय इतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणांस काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक १५/०९/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ०६.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | ''आदेशावरून'' |
| कनिष्ठ लिपिक, | स्वाक्षरित/- |
| ५ वे सहे दिवाणी न्यायालय | सहा.अधिक्षक, |
| क. स्तर नदिड. | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड. |

# नागबर्डी देवस्थान यात्रा महोत्सवः पशुप्रदर्शनासह खुल्या कबड्डी स्पर्धाचे आयोजन

कंधार/प्रतिनिधी-नागपंचमी सणानिमित्त कंधार तालुक्यातील गुंडा येथील नागोबा देवस्थान, नागबर्डी यात्रा महोत्सवानिमित्त सोमवार, दि.१७ ऑगस्ट रोजी लालकंधारी जनावरांचे भव्य पशुप्रदर्शन तसेच खुल्या कबड्डी सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य विधिमंडळ उपविधान समितीचे प्रमुख आ.प्रतापराव पाटील चिखलीकर राहणार असून, त्यांच्या हस्ते पशुप्रदर्शन व कबड्डी स्पर्धेचा शुभारंभ होणार आहे.

नागबर्डी देवस्थानच्या वतीने पंचमी सणानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आ.आनंदराव बोंढारकर, माजी आ.मोहनअण्णा हंबर्डे, सुभाषराव साबणे, प्रणितादाई देवरे, उपविभागीय अधिकारी व्ही. बी. नरवटे, डॉ.संतोष सूर्यवंशी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पशुप्रदर्शनात लालकंधारी जनावरांच्या वासरू गट, कालवड गट, गाय गट, अदाल वळू, दातीचा वळू तसेच प्रथम वर्षाखालील जनावरांचा समावेश राहणार आहे. प्रत्येक गटातील प्रथम क्रमांकाच्या जनावरास ३ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास २ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकास १ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.दरम्यान, खुल्या कबड्डी स्पर्धेतील विजेत्या संघास २५ हजार रुपये, उपविजेत्या संघास १५ हजार रुपये, तृतीय क्रमांकाच्या संघास ९ हजार रुपये, तर चौथ्या क्रमांकाच्या संघास ५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. नावनोंदणी केल्याशिवाय पशुप्रदर्शन व कबड्डी स्पर्धेत सहभागी होता येणार नसल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. या भव्य यात्रा महोत्सवाचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर तसेच परिसरातील गावातील सरपंच व गुंडा, बिंडा व दिंडा येथील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड,
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज ११६३/२०२६
वंदनाबाई व एक वि. निरंक
ने. ता. २४/०९/२०२६

अर्जदार:- १. वंदनाबाई भ्र.माधव गोडबोले, वय : ५० वर्षे, धंदा : घरकाम, २. संबोदीप पि.माधवराव गोडबोले, वय : २७ वर्षे, धंदा : व्यापार, दोघे रा.नागसेन शाळेच्या बाजुला, प्रभातनगर, नांदेड ता.जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत माधव पि.तुकाराम गोडबोले यांचा मृत्यू दिनांक ३०-०६-२०२६ रोजी नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र.२ हा मयताचा मुलगा आहे. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ व २ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक २४/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| क. लिपिक | स्वाक्षरित/- |
| सह दिवाणी न्यायालय, | सहा.अधिक्षक |
| क.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

जा.क्र.नांवाशमनपा/क्षे.का.क्र.४/७७४/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
दिनांक : ११/०८/२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.५४/४०/२०२६-२७**

**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री.**शिवाजी शंकर वंटनकर** रा.**लोहारगल्ली,**नांदेड यांनी कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, सिटी सर्व्हे नं.**१६५६ दिनांक ३१.०५.२०२३** अन्वये प्लॉट क्र.**--** ज्याचा महानगरपालिका मालमत्ता नं.**४-१-४६६** पिन क्र. **४०४०४००६१८ यांचे क्षेत्रफळ २८.८१ चौ.मी.** असुन श्री. **दिलीप लक्ष्मणराव कंकाळ** यांच्या नांवे असलेली मालमत्ता यांचे कडून अर्जदाराने **खरेदी खत क्र.१०१६ दि.१७.०२.२०२३** च्या आधारे विकत घेतलेली आहे/वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन (०७) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. नसता वरील अवधी संपल्यानंतर अर्जदारांच्या नावाने वरील प्रमाणे मालमत्ता नोंद घेण्यास येईल.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त**
क्षेत्रिय कार्यालय क्रं.४ वजीराबाद
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

# पोलिसांच्या ताब्यातील संशयित आरोपी बेपत्ता

## मारहाणीच्या आरोपाने माहूर पोलिसांच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह

माहूर/प्रतिनिधी-पाचोंदा येथील घरफोडी प्रकरणातील संशयित श्रीकांत सुभाष तोडकर (२६) याला माहूर पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर त्याच्यावर बेदम मारहाण केल्याचा कुटुंबीयांचा गंभीर आरोप आणि त्यानंतर तो पोलिसांच्या ताब्यातूनच बेपत्ता झाल्याची घटना समोर आल्याने माहूर पोलिसांच्या कार्यपद्धतीवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ताब्यात घेतलेल्या व्यक्तीची अधिकृत नोंद, त्याच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला गुन्हा, त्याला कोठे ठेवण्यात आले होते आणि तो पोलिसांच्या ताब्यातून नेमका कसा निसटला, या प्रश्नांची उत्तरे आता पोलिस प्रशासनाला द्यावी लागणार आहेत.

पाचोंदा येथील चंद्रकलाबाई तोडकर यांनी नांदेड जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे केलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा श्रीकांत सुभाष तोडकर याला शनिवार, ८ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे नऊ ते दहा वाजता माहूर पोलिसांनी घरातून ताब्यात घेतले. घरफोडीच्या प्रकरणात चौकशीसाठी त्याला पोलिस ठाण्यात नेण्यात आले. मात्र, पोलिसांनी त्याच्यावर मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.त्यामुळे पोलिसांच्या ताब्यात असताना संशयितासोबत नेमके काय घडले, हा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. दरम्यान, पोलिसांकडून मात्र वेगळी माहिती समोर येत आहे. घरफोडी प्रकरणात श्रीकांतविरुद्ध तक्रार प्राप्त झाल्यानंतर त्याला ताब्यात घेण्यात आले होते. चोरीचा माल कुठे दिला, याची चौकशी करण्यासाठी पोलिस त्याला पाचोंदा येथे घेऊन गेले असता त्याने पोलिसांना धक्का देऊन एका पोलिस कर्मचाऱ्याला जखमी केले आणि तेथून पळ काढल्याचे पोलिस निरीक्षक देविदास चोपडे यांचे म्हणणे आहे. मात्र, पोलिसांच्या या स्पष्टीकरणामुळेच अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ताब्यात घेतलेल्या संशयिताची स्टेशन डायरीत नोंद करण्यात आली होती का? त्याला ताब्यात घेण्याची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती का? त्याच्याविरुद्ध स्वतंत्रपणे गुन्हा दाखल करण्यात आला होता का? पोलिस कर्मचाऱ्याला जखमी करून पळून गेल्याचा आरोप असेल तर त्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला का? या प्रश्नांची उत्तरे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत. पोलिसांच्या ताब्यातील व्यक्ती पोलिसांच्या नजरेसमोरून गायब होणे ही साधी बाब नसून पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरच प्रश्न उपस्थित करणारी घटना आहे. जर संशयिताने खरोखरच पोलिस कर्मचाऱ्याला धक्का देऊन पळ काढला असेल, तर त्यावेळी त्याच्यासोबत किती पोलिस कर्मचारी होते, त्याला कुठे आणि कोणत्या परिस्थितीत नेण्यात आले होते, याची माहितीही समोर येणे गरजेचे आहे. दुसरीकडे, कुटुंबीयांनी केलेले मारहाणीचे आरोप खरे असतील तर पोलिस कोठडीत संशयितासोबत झालेल्या कथित मारहाणीची चौकशी कोण करणार? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. एका बाजूला पोलिस म्हणतात की संशयित पळून गेला, तर दुसऱ्या बाजूला कुटुंबीय पोलिसांकडून मारहाणीचा आरोप करीत आहेत. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.ताब्यात घेतलेला संशयित बेपत्ता होतो आणि त्यानंतर त्याच्याविरुद्ध काय कारवाई झाली, याची स्पष्ट माहिती समोर येत नाही, हे पोलिसांच्या कारभारातील गंभीर त्रुटीचे लक्षण मानले जात आहे.

## मेंढका येथे जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-मेंढका ता.मुदखेड शिवारात सुरु असलेल्या जुगार अड्डयावर पोलीसांनी धाड टाकुन सात जणांना अटक करण्यात आली.

मेंढका शिवारात गेल्या काही दिवसांपासून जुगाराचा अड्डा सुरु होता. बुधवारी सायंकाळी मुदखेड पोलीसांच्या एका पथकाने सदरील जुगार अड्डयावर छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना गोविंद गणपत जनजवळे यांच्यासह सात जणांना पोलीसांनी अटक केली. त्यांच्याकडून रोख रक्कम, जुगाराचे साहित्य जप्त केले आहे. याप्रकरणी मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नांदेड जिल्हाप्रमुख बबन बारसे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे जिल्हाप्रमुख भुजंग पाटील यांनी पुष्पहार घालून अभिष्टचिंतन केले. यावेळी महेश देशमुख, सुनील कदम, दिलीपराव देमगुंडे, अशोक कपाटे, संतोष कल्याणकर, संतोष आलेवाड, पिंटू पाटील वासरीकर, उमेश पाटील आरसुळकर, मो.अलाउद्दीन, अविनाश झमकडे, सरपंच सदाशिव पाटील, संभाजी देशमुख, शंकर हापगुंडे यांच्यासह इतर उपस्थित होते.

# योग्य नेतृत्वासाठी शांततापूर्ण क्रांतीची गरज;सोनम वांगचुक यांचा इशारा

नवी दिल्ली: सुमारे ५० वर्षांपूर्वी भारताच्या बरोबरीने किंवा मागे असलेले थायलंड, मलेशिया, इंडोनेशिया, श्रीलंका आणि बांगलादेश आज अनेक क्षेत्रांत भारताच्या पुढे गेले आहेत. भारताची सध्याची परिस्थिती अशीच राहिली तर २०४७ पर्यंत देश विकसित राष्ट्र बनू शकणार नाही, असा इशारा पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी दिला आहे. देशाला योग्य नेतृत्व मिळवून देण्यासाठी शांततापूर्ण क्रांतीची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

गुरुवारी रात्री प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओत वांगचुक यांनी देशाच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त करत भारताच्या विकासाच्या गतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सुमारे ५० वर्षांपूर्वी भारताच्या बरोबरीने किंवा मागे असलेले थायलंड, मलेशिया, इंडोनेशिया, श्रीलंका आणि बांगलादेश आज अनेक क्षेत्रांत भारताच्या पुढे गेले आहेत, असे त्यांनी नमूद केले.देशातील प्रशासकीय आणि व्यवस्थात्मक समस्या कोणत्याही एका राजकीय पक्षापुरत्या मर्यादित नसल्याचेही वांगचुक यांनी सांगितले. २०१२-१३ मधील भ्रष्टाचारविरोधी आंदोलनानंतर सरकार बदलले; मात्र भ्रष्टाचार आणि अन्याय संपले नाहीत. त्यामुळे राजकीय नेतृत्व निवडण्याच्या पद्धतीत बदल आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले.निःस्वार्थी, निर्भय, सद्गुणी आणि सक्षम व्यक्तींचा शोध घेण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले. प्रत्येकाने आपल्या प्रदेशातून किमान एका योग्य व्यक्तीचे नाव सुचवावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. देशाची प्रगती शिक्षणव्यवस्थेशी थेट जोडलेली असून शिक्षण मागे राहिल्यास देशाचे भविष्यही मागे राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.नीट-यूजी पेपरफुटी आणि परीक्षा व्यवस्थेतील अनियमिततेच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यासाठी वांगचुक यांनी २८ जून रोजी दिल्लीतील जंतरमंतर येथे उपोषण सुरू केले होते. १८ जुलै रोजी प्रकृती खालावल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. सरकारकडून आश्वासन मिळाल्यानंतर त्यांनी २४ जुलै रोजी उपोषण मागे घेतले होते.

## श्रेया गट्टूवार,विश्वजीत पाशावारचे घवघवीत यश

कुंडलवाडी/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून घेण्यात येणाऱ्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत कुंडलवाडी शहरातील के. रामलू शाळेने घवघवीत यश संपादन केले आहे. बिलोली तालुक्याच्या शहरी भागातून या परीक्षेत के. रामलू शाळेच्या दोन विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला. शाळेतील श्रेया संजय गट्टूवार हिने ८०.५३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर विश्वजीत सयाराम पाशावार याने ६७.७८ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. दोन्ही विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरल्याने शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.शाळेच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार, सचिव यशवंत संगमवार, संचालिका रमा ठक्कूरवार, प्राचार्य संभाजी जाधव व उपप्राचार्य सपना म्हैसेवाड यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे कुंडलवाडी शहरासह बिलोली तालुक्यातून त्यांचे कौतुक होत आहे.

## आ.राजेश पवार यांच्या नेतृत्वात उद्या भव्य तिरंगा रॅली



धर्माबाद/प्रतिनिधी-भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत उद्या शनिवार, १५ ऑगस्ट रोजी सकाळी ठीक ११ वाजता धर्माबाद शहर आणि परिसरात भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.राजेश पवार यांच्या नेतृत्वाखाली ही रॅली निघणार असून, यात शहरातून व तालुक्यातून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

धर्माबाद येथील तिरंगा रॅलीचा मार्ग धर्माबाद येथील महाविर चौक, बन्नाळी रोड येथून सकाळी ११ वाजता रॅलीला भव्य प्रारंभ होईल. ही रॅली शहरातील शिव मंदिर, रामनगर, आंध्रा बस स्टॅन्ड, मुख्य बाजारपेठ आणि प्रमुख चौकांमध्ये मार्गक्रमण करत देशप्रेमाचा संदेश देईल. रॅलीचा समारोप पानसरे चौक येथे राष्ट्रगीताने केला जाईल. या ऐतिहासिक सोहळ्याला प्रामुख्याने आमदार राजेश पवार उपस्थित राहणार असून, त्यांच्यासोबत धर्माबाद तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित राहून नागरिकांना संबोधित करतील. धर्माबाद तालुका आणि परिसरातील सर्व प्रमुख लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते या रॅलीचे नेतृत्व करणार आहेत.राष्ट्रभक्तीचा महाउत्सव आ.राजेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण मतदारसंघात या रॅलीचे चोख नियोजन करण्यात आले आहे. धर्माबाद सोबतच नायगाव आणि उमरी तालुक्यातही एकाच वेळी ही रॅली निघणार आहे. स्वातंत्र्यदिनाचा हा पवित्र सोहळा अधिक उत्साहात साजरा करण्यासाठी आणि तरुण पिढीमध्ये देशभक्तीची भावना दृढ करण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. धर्माबाद परिसरातील सर्व व्यापारी, तरुण मंडळ, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी हातात तिरंगा घेऊन वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १ वरुन

### विकृत शक्तींना...

खरे आहे. पण गुरुजींचा हात माझ्या डोक्यावर आहे. मी गुरु महाराजांचा आभार मानतो. या घटनेमुळे मी किंचितही विचलित झालेलो नाही. किंवा मी घाबरलो नाही आणि पुढेही घाबरणार नाही. प्रकाश सिंग बादल यांच्याप्रमाणेच मी अशा विध्वंसक शक्तींविरुद्ध पूर्ण ताकदीने लढेन. पत्रकारांशी संवाद साधल्यानंतर श्री बादल कुटुंबासह पोलीस बंदोबस्तात पंजाबच्या दिशेने रवाना झाले.

### दिल्लीतील सहा ठिकाणांना...

तपासणी वाढविण्यात आली असून सुरक्षा यंत्रणा सतर्क आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करणार असल्याने राजधानीतील सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे.

### जातनिहाय जनगणनेसाठी...

त्याचे कारण याचीही नोंद करण्यात येणार आहे.कुटुंबातील सदस्यांची माहिती, आई-वडिलांची माहिती, दिव्यांगत्व, ओळखविषयक माहिती, कुटुंब आणि इतर सामाजिक बाबींशी संबंधित प्रश्नांचाही प्रश्नावलीत समावेश करण्यात आला आहे. २०२७ ची जनगणना डिजिटल पद्धतीने घेण्यात येणार आहे. त्यामुळे माहिती संकलन आणि आकडेवारी तयार करण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद होण्याची अपेक्षा आहे. देशाची सामाजिक, आर्थिक आणि लोकसंख्यात्मक स्थिती स्पष्ट करणाऱ्या या जनगणनेच्या आकडेवारीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ८० वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही...

नसल्याची खंत व्यक्त होत आहे. एकीकडे लांब पल्ल्याच्या मार्गांवर बसेस धावत आहेत; दुसरीकडे तालुक्यातील अनेक गावे सार्वजनिक वाहतुकीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे आगाराच्या उत्पन्नाबरोबरच ग्रामीण भागाच्या सामाजिक गरजांकडेही एसटी महामंडळाने गांभीर्याने पाहण्याची मागणी होत आहे. रेणुकादेवी, दत्तशिखर आणि अनुसया माता मंदिरामुळे माहूर हे देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. वर्षभर लाखो भाविक येथे येत असताना माहूर गडावर जाण्यासाठी पुरेशी एसटी सेवा उपलब्ध नसल्याची परिस्थिती आहे. आगारातून गडाच्या दिशेने मर्यादित बसफेऱ्या होत असून सकाळच्या काही फेऱ्यांनंतर दुपारच्या वेळेत भाविकांना अडचणींचा सामना करावा लागतो. बाहेरून येणाऱ्या भाविकांना अनेकदा खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो. देशभरातील तीर्थक्षेत्र म्हणून ओळख असलेल्या माहूरमध्येच सार्वजनिक वाहतुकीची अशी अवस्था असणे ही प्रशासनासाठी गंभीर बाब मानली जात आहे. एसटी ही केवळ प्रवासाची सुविधा नाही; ती ग्रामीण भागासाठी शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि शासकीय योजनांशी जोडणारी जीवनवाहिनी आहे. त्यामुळे माहूर तालुक्यातील एसटीवंचित गावांचे तातडीने सर्वेक्षण करून पात्र गावांमध्ये नियमित बससेवा सुरू करावी. तसेच तीर्थक्षेत्र माहूर गडावर दिवसभर पुरेशा बसफेऱ्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे. स्वातंत्र्याला ८० वर्षे झाली असून मात्र एसटीच्या प्रतीक्षेत असलेली माहूरची ही गावे अजूनही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूरच आहेत. आता तरी प्रशासनाच्या नकाशावर ही गावे येणार का? हा प्रश्न माहूरच्या डोंगररांगांमधून आजही घुमत आहे.

# स्वारातीम विद्यापीठात तिरंगा रॅली उत्साहात



नांदेड/प्रतिनिधी-भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या हर घर तिरंगा अभियानांतर्गत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात तिरंगा रॅलीचे उत्साहात आयोजन करण्यात आले. देशभक्तीपर घोषणांनी आणि तिरंग्याच्या अभिमानाने विद्यापीठ परिसर भारावून गेला.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर जी. चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर, ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम आदींची उपस्थित होती.रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. हातात तिरंगा घेऊन विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणा देत स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित केला. हर घर तिरंगा अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकामध्ये राष्ट्रध्वजाबद्दल अभिमान, राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने या रॅलीचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. मारुती गायकवाड यांच्या संयोजनातून तसेच विद्यापीठ परिसर कार्यक्रमाधिकारी डॉ. नंदकुमार बोधगिरे यांच्या सहकार्याने रॅली यशस्वीपणे पार पडली.

## अश्लील फोटो काढून ब्लॅकमेल;महिलेचे लैंगिक शोषण

देगलूर/प्रतिनिधी-मरखेल येथील एका महिलेचे संमती शिवाय अश्लील फोटो काढून ते पतीला पाठविण्याची धमकी देत वारंवार लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एवढ्यावरच न थांबता आरोपीने संबंधित महिलेचे फोटो व्हॉट्सप ग्रुपवर प्रसारित केल्याची तक्रार पोलिसांकडे दाखल झाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलेने १३ ऑगस्ट रोजी मरखेल पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. सुमारे दोन वर्षांपूर्वी आरोपी अशोक मष्णाजी इनलावार हा महिला घरी एकटी असताना तिच्या घरी आला. त्यावेळी त्याने महिलेचे आक्षेपार्ह फोटो मोबाईलमध्ये काढल्याचा आरोप आहे. फोटो काढल्यानंतर ते पतीला पाठविण्याची धमकी देत आरोपीने महिलेला ब्लॅकमेल केले. या धमकीचा गैरफायदा घेत तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, ११ ऑगस्ट रोजी महिलेचे फोटो व्हॉट्सप ग्रुपवर प्रसारित झाल्यानंतर तिने पोलिसांकडे धाव घेतली. तिच्या तक्रारीवरून मरखेल पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी अशोक मष्णाजी इनलावार याला अटक केली असून, पुढील तपास परीविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक वैभव पडवळ करीत आहेत.

पान १ वरुन

### सौ.सुजाताताई नेम्मानिवार...

टायर फुटले होते. चालकाने रोडच्या कडेला ट्रॅव्हल्स उभी करून काम करीत होता. पाठीमागे एक सोबतची ट्रॅव्हल्स उभी होती.दरम्यान उभ्या ट्रॅव्हल्सला भरधाव वेगाने येणाऱ्या कँटेनरने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने बाजूला दुभाजकावर बसलेल्या महिलांच्या अंगावर गाडी आल्याने टायरखाली सापडून भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशोकराव नेम्मानिवार यांच्या पत्नी सौ.सुजाताताई (वय ५५) आणि पत्रकार किरण तिरमनवार यांच्या पत्नी सौ.माधवी (वय ४८) यांचे दूर्दैवी निधन झाले होते. मनीषा भास्कर नेमानीवार, सुनीता प्रकाश गुंटापेलिवार ह्या जखमी झाल्या असून त्यांच्यावर निजामाबाद येथील हॉस्पीटलमध्ये उपचार सुरू असल्याचे सांगितले. शहरातील वेलमापुरा, रामनगर, बेल्लोरी, मांडवा येथील वेलमा समाजाच्या जवळपास ६० महिला दोन खाजगी ट्रॅव्हल्सने प्रवासात असल्याचे सांगण्यात आले.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४